# राशिभविष्य - जुलै, २०२१.

**दादा दामले ( dadadamle@gmail.com)**

==================================================================

**सूचना - प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या राशीच्या जन्मनक्षत्रासाठी असलेल्या त्या त्या जन्मनक्षत्राचा "तारक मंत्र" दिला आहे. कारण आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा**

**उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे, व्याधी, पीडा, आजार व अन्य समस्या यांचे निवारण होते, असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही तसा प्रयत्न करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आल्यास आम्हांस कळवावे.**

==================================================================

**(१) मेष -** या या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत हर्षल असून तो शास्त्रीय संशोधन व गूढ संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. पण या हर्षलमुळे या राशीच्या काही मंडळींचा स्वभाव चंचल, लहरी, धाक दडपण सहन न होणारा असा घडण्याची शक्यता आहे. या राशीची लहान मुले तर अतिशय वांड, खोडकर होणे संभवते. जपा. या राशीच्या द्वितीय या धन, वाचा व कुटुंब स्थानी राहू व बुध असे दोन ग्रह असून येथील बुध महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या

राशीच्या तृतीय स्थानी मिथुन राशीत जात आहे. पण हा बुध महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे दुःख, शत्रुत्व व शत्रुभय असह्य मनस्ताप देण्याची शक्यता आहे. असे असले तरी हा बुध या राशीच्या काही मंडळींना धनदायकही होऊ शकेल. पण येथील राहू आर्थिक चिंता निर्माण करील. या राशीच्या तृतीय स्थानी रवि ग्रह आहेच. तो महिन्याच्या पूर्वार्धात सर्व प्रकारे अनुकुल होईल व त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील, धनलाभ होईल. या राशीच्या शासकीय नोकरीत असणारांपैकी काहींचा वरिष्ठ अधिकारी प्रसन्न झाल्यामुळे सन्मान होईल, क्वचित कोणास एखादे उच्च पदही मिळू शकेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या चतुर्थ स्थानी कर्क राशीत गेल्यावर प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळीना अनारोग्य,

कौटुंबिक त्रास, तर काही मंडळींना कार्यदिरंगाई, आर्थिक चिंता, दुःख सहन करावे लागेल व नैराश्य येईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी कर्क राशीत मंगळ व बुध हे दोन ग्रह आहेतच. येथील मंगळ ग्रह पूर्णपणे प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनात वाद, भांडणे, गैरसमज, दुःख, असमाधानकारक घटना,अन्य कटकटी अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा. पण येथील शुक्र शेतीवाडी असणारांना लाभदायक होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेला शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी सिंह राशीत गेल्यावर सर्व प्रकाराच्या कलावंत मंडळींना थोड्या प्रमाणात त्यांच्या कलेतील आनंद देऊ शकेल. तसेच या शुक्रापाठोपाठ मंगळ ग्रहही दिनांक २० पासून या राशीच्या पंचम स्थानी जात आहे. त्यावेळी तो अधिक प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे मुलांचे आजारपण, अयोग्य आचरण अशापैकी कारणांनी संततिविषयक समस्या त्रस्त करतील. या राशीच्या अष्टम स्थानी वृश्चिक राशीत केतु असून त्याच्यामुळे कुटुंबात कलह , भांडणे होतील, वैवाहिक जीवनातही सुखसमाधान लाभणार नाही. त्याशिवाय तो अनारोग्यकारक असून त्याच्यामुळे काही मंडळींना मुखदंत रोग, काहींना रक्तविकार तर काहींना त्वचारोगाचा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या दशम स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून त्याच्यामुळे नोकरीव्यवसायात खूप प्रयत्नाने अर्थलाभ होईल. या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरु ग्रह पूर्णपणे अनुकुल होईल व त्याच्यामुळे या राशीचे विद्यार्थी शैक्षणिक प्रगती करू शकतील, या राशीच्या काही मंडळींच्या इच्छाआकांक्षा पूर्ण होतील, वाहनसुख मिळेल, काही मंडळींना अपेक्षित धनलाभ होईल, या राशीच्या काही विवाहेच्छूचे विवाह जमतील व संपन्न होतील. पण येथील नेपच्यूनमुळे आर्थिक नुकसान, आर्थिक घोटाळे, अर्थप्राप्तीस विलंब होण्याची शक्यता आहे. तसेच कुमार्गी मित्र असतील त्यांना या कुमार्गी मित्रांपासून मनस्ताप सहन करावा लागेल. त्यामुळे नैराश्य येईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा”चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी “ओम अश्विनीकुमाराभ्यां नमः” मंत्राचा,

ज्यांचे जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी "ओम यमाय नमः" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी " ओम अग्नये नमः" या तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत बुध व राहू असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह या महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होण्याची शक्यता आहे. बुधामुळे मनस्थिती चंचल होईल, व धननाश, मित्रद्रोह अशापैकी घटना घडण्याची शक्यता आहे. हा बुध महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी मिथुन राशीत गेल्यावर दुःखदायक घटना घडतील; पण तो धनदायक होईल या राशीच्या प्रथम स्थानी बुधासह राहू आहेच. या राहूमुळे अपमान होणे संभवते. त्याचा परिणाम म्हणून मनात सूडभावना प्रबळ होईल. त्याशिवाय काही मंडळींना वातविकाराचा आजार त्रस्त करील. जपा. या राशीच्या धनस्थानी मिथुन राशीत रवि ग्रह आहेच. हा रवि ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे आर्थिक जबाबदाऱ्या पूर्ण करण्याची व वाढत्या खर्चाची समस्या त्रस्त करील. त्याशिवाय आर्थिक नुकसान होणे व वाद, भांडणे होणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या तृतीय स्थानी कर्क राशीत गेल्यावर अनुकुल होईल व त्याच्यामुळे आरोग्य सुधारेल. नोकरीत वरिष्ठ कामावर खूष होतील, काही मंडळींचा सन्मान होणेही संभवते. क्वचित कोणास उच्च पद मिळणेही शक्य आहे. सर्व सुख लाभेल. तसेच महिन्याच्या पूर्वार्धात धनस्थानी असलेला बुध ग्रहही महिन्याच्या अखेरच्या दिवशी या राशीच्या तृतीय स्थानी कर्क राशीत प्रवेश करील. या राशीच्या तृतीय स्थानी कर्क राशीत प्रथमपासून मंगळ व शुक्र असे दोन ग्रह आहेतच. येथील मंगळामुळे महत्त्वाकांक्षा वाढेल, धैर्य, हिंमत वाढेल व हातून कर्तबगारीची घटना घडेल. प्रवासाचे योग येतील, पण दुखापत होणेही संभवते. हा मंगळ महिनाच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी सिंह राशीत गेल्यावर कौटुंबिक जीवनात भांडणे, वाद, गैरसमज, अन्य कटकटी, असमाधानकारक घटना घडण्याची शक्यता आहे.जपा. या मंगळासोबत असलेल्या शुक्र ग्रहामुळे काही मंडळींना भूमिलाभ होईल, शासकीय नोकरदार मंडळींपैकी कोणाचा मानसन्मान होईल; त्तर कोणाला प्रतिष्ठा प्राप्त होईल. हा शुक्र ग्रहही महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी सिंह राशीत येत आहे. त्यावेळी शेतीवाडी असणारांना तो लाभदायक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच मनस्थिती अस्थिर, चंचल होणे

संभवते. या राशीच्या भाग्य स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून तो साधारणपणे शुभकारक होईल व काहींना दूरच्या प्रवासाचे योग येतील. या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील गुरु बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. काही मंडळींना नवे आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. नोकरीत वरिष्ठ तुमच्या कामाचे कौतुक करतील. काहींचा मानसन्मान होणेही शक्य आहे. पण येथील नेपच्यून केवळ मनोवैज्ञानिकांनाच अनुकुल होईल. या राशीच्या व्ययस्थानी हर्षल असून त्याच्यामुळे सांपत्तिक अडचणी निर्माण होणे संभवते. शिवाय अकारण शत्रुत्व निर्माण होणे, बेअब्रूचे, जिवावरचे प्रसंग येणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता असते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना मनःशांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीशिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी “ओम अग्नये नमः“ मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी “ओम ब्रह्माय नमः:” मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ओम सोमसोमाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी रवि असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी जात आहे. तसेच या राशीच्या व्ययस्थानी असलेला बुध महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत येत आहे. त्यामुळे रवि व बुध हे दोन्ही ग्रह या महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होण्याची शक्यता आहे. रविमुळे अनारोग्य, थकवा, मनस्ताप, नेत्रविकार, वित्तहानी, वाढत्या खर्चाची चिंता, कुटुंबात वाद, भांडणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता आहे. बुधामुळे अपयश, मानहानी, अनारोग्य, धननाश, मित्रद्रोह, कुसंगतीचा त्रास होणे संभवते. त्यामुळे मनस्थिती चंचल व अस्वस्थ राहील. या राशीच्या व्ययस्थानी संपूर्ण महिन्याच्या काळात वृषभ राशीत राहू आहेच. पण तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे काही मंडळींना अर्थलाभ होईल; तर काहीना परदेशगमनाची संधी मिळेल. पण या राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या धनस्थानी कर्क राशीत मंगळ व शुक्र असे दोन ग्रह आहेतच. मंगळामुळे महिन्याच्या पूर्वार्धात उष्णता विकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता

आहे. तसेच आर्थिक समस्या त्रस्त करतील. शुक्र ग्रह अनुकुल होईल व त्याच्यामुळे वैवाहिक व कौटुंबिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. महिन्याच्या उत्तरार्धात येथील मंगल व शुक्र या राशीच्या तृतीय स्थानी सिंह राशीत जात आहेत. त्यावेळी हे दोन्ही ग्रह अनुकुल होतील व मंगळामुळे हिंमत वाढेल, महत्त्वाकांक्षा वाढेल व हातून एखादी कर्तृत्व सिद्ध करणारी घटना घडू शकेल. काही मंडळींना प्रवासाचे योग येतील. शुक्रामुळे महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या काही मंडळींना भूमिलाभ होणे संभवते. शासकीय नोकरदार मंडळींपैकी कोणाचा सन्मान होईल; तर क्वचित कोणास एखादे उच्च पदही मिळू शकेल. या राशीच्या षष्ठ स्थानी वृश्चिक राशीत केतू असून तो नोकरी-व्यवसायास पूरक व अनुकुल होईल. आरोग्य उत्तम राहील व आचारविचार उच्च होतील. मनस्थिती उदार होईल व काही मंडळींना प्रसिद्धी मिळू शकेल. या राशीच्या अष्टम स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून तो आरोग्यविघातक होईल व काही मंडळींना एखादा मोठा आजार होणेही संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह अध्यात्मात रस असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होतील. आवडत्या दैवताच्या उपासनेतून आध्यात्मिक प्रगती होईल व मनःशांती लाभेल. तसेच सद्गुणांची वाढ होईल, प्रवासयोग येईल. नेपच्यूनमुळे सूचक स्वप्ने पडतील व काही मंडळींना परदेशवारीची संधी मिळेल. या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत हर्षल असून त्याच्यामुळे निश्चित असे काहीच घडणार नाही. पण मित्रांशी वाद, भांडणे होण्याची शक्यता आहे. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर " श्रीगणेशअथर्वशीर्षा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी " ओम सोमसोमाय नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी " ओम नमः: शंकराय " मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी "ओम अदितीये नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क-** या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत हर्षल असून तो नोकरी- व्यवसाय काहीही असो अनुकुल होईल. नोकरदार मंडळींना बढती मिळू शकेल व व्यावसायिकांना व्यवसायात लाभ होतील. विशेष करून बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अधिक लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी वृषभ राशीत बुध व राहू असून येथील बुध महिन्याच्या पूर्वार्धात सुखसमाधानकारक

होईल व त्याच्यामुळे धनलाभ व मित्रलाभ होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या व्ययस्थानी मिथुन राशीत गेल्यावर प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे हाती घेतलेल्या कार्यात अपयश येईल..मानहानी होईल. अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेल. आर्थिक चिंता त्रस्त करील. लाभस्थानी असलेल्या राहूमुळे ज्यांच्या हाती अधिकार पद आहे त्यांना अधिकाराचा दुरुपयोग करून वाममार्ग धन प्राप्त करण्याची तीव्र इच्छा होईल; पण त्यांनी तो विचार मनातून काढून टाकावा. नपेक्षा होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. शिवाय त्याच्यामुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या व्ययस्थानी प्रथमपासून रवि ग्रह आहेच. तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी जात आहे. त्यामुळे तो महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल. शरीरपीडा, मनोभंग, अनारोग्य, मनस्ताप अशा प्रकारचा त्रास सहन करावा लागेल. या राशीच्या प्रथम स्थानी कर्क राशीत प्रथमपासून मंगळ व शुक्र असे दोन ग्रह आहेतच. हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी सिंह राशीत जात आहेत. मंगळ ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे स्वभाव हट्टी होईल, मानापमान भावना तीव्र होतील. शरीरपीडा व दगदग फार होईल. महिन्याच्या उत्तरार्धात आर्थिक चिंता त्रस्त करतील. पण शुक्र ग्रह संपूर्ण महिन्याच्या काळात अनुकुल होईल व त्याच्यामुळे सुख, चैन, कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. कौटुंबिक प्रगती होईल व धनलाभही होईल. या राशीच्या पंचम स्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे या राशीच्या विद्यार्थ्याच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होतील. तसेच त्याच्यामुळे काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील. या राशीच्या सप्तम स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून तो फारसा प्रतिकुल होणार नाही. पण त्याच्यामुळे या राशीच्या विवाहेच्छूना विवाहयोग संभवत नाही. या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील गुरुमुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसाहक्काने धनलाभ होऊ शकेल. येथील नेपच्यन जलभयकारक व विषभयकारक होणार आहे. त्यामुळे बाहेरचे उघड्यावरचे खाद्यपदार्थ खाऊ नका. खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. शक्यतो जलप्रवास करू नका. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना व श्रीहनुमान उपासना मनःशांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा “ चे पठण

करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पूनर्वसु आहे त्यांनी “ओम अदितीये नमः” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी “ओम बृहस्पतये नमः” मंत्राचा व ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी “ ओम सर्पाय नमः “ या तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या चतुर्थ स्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनात कोणाशी पटणार नाही, कसली तरी चिंता त्रस्त करील. शिवाय तो विषभयकारक असल्यामुळे बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या षष्ठ स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून तो दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल; पण त्याच्यामुळे’ गैरसमजुती होऊन वाद, भांडणे होतील. शिवाय तो अनारोग्यकारक होणेही संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरु ग्रहामुळे ज्यांचे प्रेमसंबंध आहेत ते अधिक घट्ट होतील. काही मंडळींना विवाहयोग येईल. नवे स्नेहसंबंध निर्माण होतील. अर्थलाभ होईल व प्रवासाचे योग येतील. पण येथील नेपच्यून प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येऊ शकेल. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत हर्षल असून तो शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना प्रगतिकारक होईल. तसेच काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे किंवा परदेशवारीचे योग येतील. या राशीच्या दशम स्थानी वृषभ राशीत बुध व राहू असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह अनुकुल होतील व बुधामुळे धनवृद्धी होईल. तसेच मानसिक, कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. राहूमुळे या राशीच्या शासकीय नोकरीत असणारांपैकी कर्तृत्ववान मंडळींना सन्मान प्राप्त होईल. काही मंडळींना अधिकार पद मिळेल. येथील बुध महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी मिथुन राशीत जात आहे. त्यावेळीही तो अनुकुलच होईल व त्याच्यामुळे सुखसमाधान लाभेल. धनलाभ व मित्रलाभही होईल. या लाभस्थानी मिथुन राशीत रवि आहेच. तो महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल व त्याच्यामुळे अर्थलाभ होईल, शासकीय नोकरदार मंडळींपैकी क्वचित कोणास एखादे उच्च पद प्राप्त होईल, आरोग्य उत्तम राहील, व्यावसायिकांच्या व्यवसायात वाढ होईल. पण येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी कर्क राशीत जात आहे. त्यावेळी प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल व शरीरपीडा, मानभंग अशापैकी काही घडण्याची शक्यता आहे. या व्ययस्थानी प्रथमपासून मंगळ व शुक्र हे दोन ग्रह आहेतच. हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या

राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत जात आहेत. संपूर्ण महिन्याच्या काळात हा मंगळ प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे मनस्थिती अस्वस्थ राहील, काही मंडळींना आर्थिक चिंता त्रस्त करील. मानहानी होणे संभवते. अहंकारी स्वभावामुळे अकारण दगदग कराल, त्यामुळे शरीरपीडा होईल. पण शुक्र ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल होईल व त्याच्यामुळे घरीदारी सुखसमाधान लाभेल. श्रद्धा असेल तर दररोज सकाळी स्नान झाल्यावर या राशीचा स्वामी सूर्य याच्या प्रसन्नतेसाठी "सूर्यकवचं स्तोत्रम " या स्तोत्राचे पठण करा. तसेच कुलस्वामीची उपासना करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी "ओम पितराय नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी "ओम भगाय नमः" मंत्राचा व ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी "ओम आर्यमे नमः:" या तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या** - या राशीच्या तृतीय स्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे काही कारणाने असह्य मानसिक दुःख सहन करावे लागेल. त्यासाठी आध्यात्मिक उपासना केल्यास मनःशांती लाभेल. या राशीच्या पंचम स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून त्याच्यामुळे मन व बुद्धी स्वार्थी, संशयी अत्यंत व्यवहारी होण्याची शक्यता आहे. चिकाटीने चिकित्सक बौद्धिक काम करण्यास हा शनि अनुकुल होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरुमुळे आरोग्य उत्तम राहील व तो दशम या बौद्धिक नोकरी-व्यवसायास पूरक होईल. नेपच्यूनमुळे उगीचच आपल्याला काही आजार झाला असल्याची भावना त्रस्त करील. काही मंडळींना काल्पनिक चिंता त्रस्त करील. त्याशिवाय फसवणूक झाल्याचा मनस्तापही अस्वस्थ करील. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत हर्षल असून तो अपघातकारक आहे. त्यामुळे या राशीच्या मंडळींनी सतत सावधानतेने आचरण करावे. वाहन नियंत्रित वेगात व सावधानतेने चालवावे. विजेची उपकरणे काळजीपूर्वक हाताळावीत. या राशीच्या भाग्यस्थानी वृषभ राशीत बुध व राहू असे दोन ग्रह असून येथील बुधामुळे दैनंदिन कामात अडचणी, अडथळे, दिरंगाई अशापैकी घटना घडण्याची शक्यता आहे. तसेच वाद, भांडणे होणेही संभवते. राहूमुळे प्रवासयोग येतील. पण संततिसुखात बाधा येऊ शकेल. या राशीच्या दशम स्थानी मिथुन राशीत रवि ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात बुध ग्रह या दशम स्थानी मिथून राशीत येत आहे. बुधामुळे महिन्याच्या उत्तरार्धात कौटुंबिक सुखसमाधान मिळू शकेल. रवि ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात

अनुकुल होईल व त्याच्यामुळे आर्थिक लाभ होतील, काही मंडळींना समाजात मान,प्रतिष्ठा, कीर्ती, तर काही मंडळींना हुद्दा, अधिकारपद मिळू शकेल. महिन्याच्या उत्तरार्धात हा रवि या राशीच्या लाभस्थानी जात आहे. या राशीच्या लाभस्थानी प्रथमपासूनच मंगळ व शुक्र असे दोन ग्रह असून मंगळामुळे मैत्रीत वितुष्ट निर्माण होणे संभवते. तसेच अर्थप्राप्तीसाठी खूप परिश्रम करावे लागतील. पण या राशीच्या काही मंडळींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणेही संभवते. येथील मंगळ -शुक्र हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी सिंह राशीत जात आहेत. त्यावेळी शुक्र अनुकुल व सुखसमाधानकारक होईल; पण मंगळामुळे मनस्थिती अस्वस्थ राहील, वाद, भांडणे, मानहानी होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्राचे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी "ओम आर्यमे नमः " मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी " "ओम सूर्याय नमः " मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नमः" या तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा** - या राशीच्या धनस्थानी केतु असून त्याच्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. या राशीच्या चतुर्थ स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून त्याच्यामुळे गृहसौख्यात बाधा येणे संभवते. त्यामुळे नैराश्य येईल. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील गुरु सर्व प्रकारे अनुकुल व सुखदायक होईल. त्याच्यामुळे प्रेमसंबंध वाढतील, अर्थलाभ होईल व या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करण्यास अनुकुल होईल. येथील नेपच्यूनमुळे मनस्थिती अति भावनाशील होण्याची शक्यता आहे. पण तो अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करण्यास अनुकुल होईल. तसेच गूढ संशोधनकार्यात कार्यमग्न असणारांना अपेक्षित प्रगती करण्यास अनुकुल होईल. या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत हर्षल असून त्याच्यामुळे वैवाहिक जीवनात पतिपत्नीपैकी कोणा एकाचे लहरी, विक्षिप्त आचरण, दोघांतही वाद, भांडणे अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील . बाधा येणे संभवते. जपा. तसेच ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे अशांच्या भागीदारीत संशय, मतभेद, वाद अशापैकी कारणांनी बाधा येण्याची शक्यता आहे. या राशीच्या अष्टम स्थानी

वृषभ राशीत बुध व राहू असे दोन ग्रह असून येथील बुध महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी जात आहे. त्यामुळे हा बुध महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल व त्याच्यामुळे नियोजित कार्यात यश मिळेल व सुखसमाधान लाभेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो प्रतिकूल होईल व त्याच्यामुळे नियोजित कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होऊन कार्यदिरंगाई होणे संभवते. तसेच वाद, भांडणे होण्याची शक्यता आहे. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी मिथुन राशीत प्रथमपासून रवि ग्रह आहेच. पण तो महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे नोकरीत कामाचा ताण सहन करावा लागेल. कसली तरी चिंता, भय त्रस्त करील व नैराश्य येईल. शिवाय वडील मंडळींचा विरोधही सहन करावा लागेल. महिन्याच्या उत्तरार्धात हा रवि या राशीच्या दशम स्थानी कर्क राशीत गेल्यावर अनुकुल होईल व परिस्थितीत सुधारणा होईल. नोकरी-व्यवसायात मनोनुकुल घटना घडतील, अर्थलाभ होईल व सुखाचे दिवस येतील. ह्या राशीच्या दशम स्थानी कर्क राशीत प्रथमपासून मंगळ व शुक्र असे दोन ग्रह आहेतच. येथील मंगळामुळे स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडतील, नोकरीत कामाचा ताण असह्य होईल. या राशीच्या काही मंडळींना हातची नोकरी सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. पण त्यांनी मनावर ताबा ठेवून हाती आहे ते नोकरीच मनापासून करावी. येथील शुक्र महिन्याच्या पूर्वार्धात कला कार्यक्षेत्र असणारांना प्रतिकुल होईल व सुखसमाधान लाभणार नाही. पण येथील मंगळ व शुक्र हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी सिंह राशीत जातील त्यावेळी मंगळामुळे मैत्रीत वितुष्ट येण्याची शक्यता आहे. जपा. कष्ट, परिश्रम होऊनच अर्थलाभ होईल. पण या राशीच्या काही मंडळींना एखादी मौल्यवान वस्तू मिळण्याची शक्यताही आहे. शुक्र ग्रह अनुकुल होईल, अर्थलाभ होईल व सर्व प्रकारे सुखसमाधान लाभेल. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी “ओम त्वष्टे नमः” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र स्वाती आहे त्यांनी “ओम वायवे नमः:” मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी “ओम इंद्राग्नये नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप जरावा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत केतू असून त्याच्यामुळे सर्व सुख, ऐषाराम लाभेल; पण त्याच्यामुळे वाहन अपघात होणे संभवते. म्हणून सतत सावधानतेने आचरण करा. या राशीचा तृतीय स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना अपेक्षित अशी उत्तम नोकरी मिळेल. काहींना आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण या शनिमुळे भावंडाविषयक एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील गुरुमुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल, काही मंडळींचे स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार अपेक्षेनुसार पार पडतील, पण नातेसंबंधातील कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते. नेपच्यूनमुळे घरगुती संबंधात गैरसमज, घोटाळे निर्माण होतील. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत हर्षल असून तो दशम या नोकरीव्यवसाय स्थानास पूरक होईल व चिकित्सक बौद्धिक नोकरी व्यवसाय असणारांना अनुकुल होईल. पण या राशीच्या मंडळींनी सतत खोल विचार करत बसू नये. नपेक्षा डोकेदुखी वा मेंदूविकार अशापैकी आजार होऊ शकेल. या राशीच्या सप्तम स्थानी वृषभ राशीत बुध व राहू असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह प्रतिकुल होतील. बुधामुळे भांडणे होतील व दुःख सहन करावे लागेल. राहूमुळे मनात कपटी विचार येतील, वाममार्ग धन मिळविण्याची तीव्र इच्छा प्रबळ होईल. त्याशिवाय वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होईल. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी मिथुन राशीत रवि ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात सप्तम स्थानी असलेला बुध या अष्टम स्थानी येत आहे. त्यावेळी हा बुध अनुकुल व यशदायक होईल आणि त्याच्यामुळे कार्यसिद्धी होऊन सुखसमाधान लाभेल. पण रवि ग्रह या स्थानी व महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी गेल्यावरही प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे इच्छा अपूर्ण राहतील, दुःख, अनारोग्य सहन करावे लागेल, हाती घेतलेल्या कामात अपयश येईल, संततिसुखात बाधा येणे संभवते, मानसिक ताण, विरोध सहन करावा लागण्याची शक्यता आहे. या भाग्यस्थानी प्रथमपासून मंगळ व शुक्र असे दोन ग्रह आहेतच. मंगळ ग्रहामुळे प्रवासात मनस्ताप व मानहानी सहन करावी लागण्याची शक्यता आहे. सबब शक्यतो प्रवास करूच नका. पण शुक्र ग्रह अनुकुल होईल व त्याचमुळे गुरुकृपा, थोरकृपा, सुसंगती, ऐषाराम प्राप्त होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात हे दोन्ही ग्रह या राशीच्या दशम स्थानी गेल्यावर प्रतिकुल होतील व मंगळामुळे व्यवसायात

खळबळजनक घटना घडतील, नोकरीत कामाचा ताण सहन करावा लागेल. काही मंडळींना हातची नोकरी सोडून नवीन काही करावेसे वाटेल. पण त्यांनी तसे काही करू नये. आहे ती नोकरीच मनापासून करावी. शुक्र ग्रहही प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. नोकरी-व्यवसायात अडचणी, दुःख सहन करावे लागेल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीगणपति अथर्वशीर्ष स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा आहे त्यांनी "ओम मित्राय नमः;" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी "ओम इंद्राय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु -** या राशीच्या व्ययस्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे स्वभाव चंचल, लहरी असा घडण्याची शक्यता आहे. या राशीच्या धनस्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून तो अनारोग्यकारक होईल व त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. त्याशिवाय आर्थिक संकटे येणेही संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील गुरुमुळे या राशीच्या लेखकवर्गाचे लेखन ग्रंथरूपात प्रकाशित होईल. काही मंडळींना प्रवासाचे योग येतील. पण भावंडांपैकी कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यता आहे. जपा. येथील नेपच्यूनमुळे मनस्थिती भावनाशील होईल व अध्यात्माची ओढ असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. तसेच गूढ संशोधनात व्यग्र असणारांना यश मिळू शकेल. त्याशिवाय या नेपच्यूनमुळे काही मंडळींना जलप्रवासाचे तर काही मंडळींना परदेशवारीचे योग येतील. या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत हर्षल असून त्याचा गुरु ग्रहाशी शुभ योग होत असल्यामुळे उच्च बौद्धिक संशोधन कार्यक्षेत्र असणारांना तो अनुकुल, राहू असे दोन ग्रह असून बुध ग्रह बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना अनुकुल, प्रगतिकारक प्रगतिकारक व यशदायक होईल. तसेच त्याच्यामुळे काही मंडळींना अंतर्ज्ञान शक्ती प्राप्त होणे संभवते. त्याशिवाय हा हर्षल कलाक्षेत्रास पोषक असून या राशीच्या कलाकारांना व कलाक्षेत्रातील विद्यार्थ्यांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल.

या राशीच्या षष्ठ स्थानी वृषभ राशीत बुध व राहू असे दोन ग्रह असून येथील बुध यशदायक, धनदायक व कीर्तिदायक होईल. परंतु या स्थानी असलेल्या राहूमुळे मनस्थिती कावेबाज होणे संभवते. तरीही त्याच्यामुळे हितशत्रू पराभूत होतील. तसेच अन्य जातिधर्माच्या मित्रांपासून लाभ होतील. पण या राहूमुळे काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करीतसे दिसते. या षष्ठ स्थानी असलेला बुध महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी मिथुन राशीत जात आहे. त्यावेळी तो प्रतिकुल होणे संभवते. त्याच्यामुळे वाद, भांडणे होतील व दुःख सहन करावे लागण्याची शक्यता आहे. या राशीच्या सप्तम स्थानी मिथुन राशीत रवि आहेच. तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी कर्क राशीत जात आहे. त्यामुळे तो संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. त्याच्यामुळे काही मंडळींना अनारोग्य, हृदयविकार होणे संभवते. काही मंडळींच्या इच्छा अपेक्षा अपूर्ण राहतील. हाती घेतलेल्या कार्यात अपयश येईल, संततिसुखात बाधा येईल. जपा. या अष्टम स्थानी कर्क राशीत मंगळ व शुक्र असे दोन ग्रह असून ते महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी जात आहेत. या राशीच्या अष्टम स्थानी असलेला मंगळ अनारोग्यकारक होईल व त्याच्यामुळे मूळव्याधीसारखे उष्णताविकाराचे आजार होणे संभवते. त्याशिवाय छोटेमोठे अपघात होणेही संभवते. त्यात हाडमोड होण्याची शक्यता दिसते. तसेच तो जलभयकारक व वीजभयकारक असल्यामुळे खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. जलप्रवास करू नका. विजेवर चालणारी उपकरणे सावधानतेने हाताळा. महिन्याच्या उत्तरार्धात या मंगळामुळे प्रवासात त्रास, मानहानी होण्याची शक्यता आहे. म्हणून त्या काळात शक्यतो प्रवास करू नका. अष्टम स्थानी असलेला शुक्र महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल होईल व त्याच्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात कमी श्रमात अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होईल. ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसाहक्काने धनलाभ होऊ शकेल. पण हा शुक्र या राशीच्या वृद्धांना प्रतिकुल होईल. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या भाग्यस्थानी गेल्यावर त्याच्यामुळे सुसंगती लाभेल. ऐषाराम मिळेल. गुरुकृपा, थोरकृपा प्राप्त होऊन कीर्ति -प्रसिद्धीही मिळू शकेल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना व शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असल्यामुळे श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापुर्वी

“हनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी “ ओम निऋतये नमः:” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी “ओम उदकाय नमः:” मंत्राचा, आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी “ ओम विश्वेदेवाय नमः:” या तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत शनि ग्रह असून तो संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे स्वतःच्या व जीवनसाथीच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करील.

तसेच दैनंदिन कार्यात अडथळे, अडचणी निर्माण होतील. कौटुंबिक जीवनातील कोणा प्रिय व्यक्तीचे दूरत्व निर्माण झाल्यास असह् मानसिक अस्वस्थता निर्माण होईल व नैराश्य येईल. पण धन, कुटुंब स्थानी गुरु ग्रह असल्याने काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या शनिमुळे या राशीच्या काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येणेही संभवते. या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरु ग्रह अनुकुल तर नेपच्यून ग्रह प्रतिकुल होईल. येथील नेपच्यूनमुळे आर्थिक समस्या मनस्ताप देतील; पण गुरु ग्रहाच्या अनुकुलतेममुळे नोकरी-व्यवसायात प्रगती होईल, उत्तम अर्थलाभही होईल व कुटुंबात शुभ घटना घडतील. त्यामुळे दिलासा मिळेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत हर्षल असून त्याच्यामुळे मनस्थिती सतत अस्वस्थ राहील. कशामुळेही सुखसमाधान लाभणार नाही. कोणाशी पटणार नाही. आहे त्या परिस्थितीत सतत तक्रारी करत राहाल. जपा. या राशीच्या पंचम स्थानी वृषभ राशीत राहू व बुध असे दोन ग्रह असून येथील राहूमुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. पण या स्थानी असलेला राहू दलाली-कमिशनवर व्यवसाय असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. या स्थानी असलेल्या बुधामुळेही संततिविषयक समस्या मनस्ताप देतील. पण येथील बुध महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी मिथुन राशीत गेल्यावर अनुकुल होईल व त्याच्यामुळे काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. तसेच या राशीच्या षष्ठ स्थानी मिथुन राशीत प्रथमपासून रवि ग्रहही आहेच. तो महिन्याच्या पूर्वार्धात दशम या व्यवसायस्थानास पूरक होईल व त्याच्यामुळे हितशत्रू पराभूत होतील व मनःशांती लाभेल. येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर

अनारोग्यकारक होणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी कर्क राशीत मंगळ व शुक्र असे दोन ग्रह प्रथमपासून आहेतच. मंगळामुळे जीवनसाथी/संगिनीच्या आरोग्यविषयक समस्या व अन्य कटकटी वेवाहिक जीवनातील सुखात मनस्ताप देण्याची शक्यता आहे. तसेच भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी वाद, भांडणे, गैरसमज, संशय अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. पण शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे मनोनुकुल घटना घडतील व परिस्थिती आटोक्यात राहील. येथील मंगळ -शुक्र हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी गेल्यावर मंगळामुळे उष्णताविकाराचा मूळव्याधीसारखा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. तसेच हाडमोड होणेही संभवते. त्याशिवाय हा मंगळ जलभयकारक आणि वीजभयकारक असल्याने खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका, जलप्रवास करू नका. तसेच विजेची उपकरणे सावधानतेने हाताळा. पण या स्थानी आलेल्या शुक्रामुळे या राशीच्या काही मंडळींना
कमी श्रमात अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होईल. तसेच ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होईल. काही मंडळींना वारसाहक्काने धनलाभ होईल. पण हा शुक्र या राशीच्या वृद्ध मंडळींना प्रतिकुलच होईल. या राशीच्या लाभस्थानी वृश्चिक राशीत केतू असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे प्रवासाचे योग येतील, सर्व सुख, अर्थलाभ व ऐषाराम लाभेल. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना अनकुल होईल व मनःशांती लाभेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीशिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः:" मंत्राचा, यांचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी "ओम विष्णवे नमः: " मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी " ओम वसवे नमः:" या तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गरु ग्रह शुभ असून त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील, सर्व प्रकारच्या बौद्धिक व संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना तो अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. असे कार्यक्षेत्र असणारांपैकी काही मंडळींचे लेखन प्रकाशित होईल. येथील नेपच्यूनमुळे मनस्थिती अत्यंत भावनाशील होईल,

मानसिक संवेदना अति जलद होतील, मन उदास होईल व त्यामुळे नैराश्य येईल. या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत हर्षल असून तो उच्च बौद्धिक क्षमता, स्मरणशक्ती, आकलनशक्ती असणारांना अनुकुल व यशदायक होईल. अशी उच्च बुद्धी असणारांपैकी काही मंडळींना परदेशगमनाचे योग येतील. या राशीच्या चतुर्थ स्थानी वृषभ राशीत बुध व राहू असे दोन ग्रह असून राहू कौटुंबिक जीवनातील सुखास प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे कुटुंबात मनस्तापदायक घटना घडतील व वाद, भांडणे, अन्य कटकटी अशापैकी कारणांनी सुखसमाधान लाभणारच नाही. जपा. येथील बुधामुळे मित्रसुख व गृहसौख्य लाभेल. पण त्याच्यामुळे आर्थिक नुकसान होणेही संभवते. जपा. येथील बुध ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी जात असून त्याच्यामुळे संततीपासून मनस्ताप दिला जाण्याची शक्यता आहे. जपा. त्याचा परिणाम म्हणून विचारशक्ती क्षीण होणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी मिथुन राशीत प्रथमपासून रवि ग्रह आहेच. पण तो अनारोग्यकारक होईल व त्याच्यामुळे संततीपैकी कोणाचे आजारपण, कुटुंबातील प्रिय जनांपासून दुरावा, नोकरीत वरिष्ठांचा त्रास अशापैकी घटना घडणे संभवते. शिवाय तो अपघातकारकही आहे. त्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा. हा रवि ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी कर्क राशीत गेल्यावर दशम या व्यवसायस्थानास पूरक होईल. हितशत्रू पराभूत होतील व मनःशांती लाभेल. या राशीच्या षष्ठ स्थानी कर्क राशीत प्रथमपासून मंगळ व शुक्र ते दोन ग्रह आहेतच. ते दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी सिंह राशीत जात आहेत. हा मंगळ ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होणार असून त्याच्यामुळे उष्णताविकाराचा आजार होणे, इजा होणे, ताप येणे, अपप्रचाराचा त्रास होणे, हृदयविकार बळावणे अशापैकी आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. जपा. शिवाय तो वैवाहिक जीवनातील सुखासही प्रतिकुल होईल. त्याच्यामुळे भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांच्या भागीदारीत बाधा येणेही संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला शुक्र ग्रहही महिन्याच्या पूर्वार्धात बराचसा प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे कसले तरी आळ येणे, व्यसनाधीन होणे, शुद्ध प्रेमभावना नसणे, अशापैकी कारणांनी मनस्ताप होणे संभवते. या राशीच्या सर्व प्रकारच्या कलावंत मंडळींना येथील शुक्रामुळे त्यांच्या अंगी कलागुण असूनही कलागुणात प्रगती करणे शक्य होणार नाही. कलागुण व्यक्त करण्यास संधीच मिळणार नाही. पण हा शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर काही प्रमाणात अनुकुल होईल व प्रेमिकांचे

प्रेमविवाह होतील. वैवाहिक जीवनात फारशी बाधा येणार नाही. या राशीच्या दशम स्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना हातचा नोकरी -व्यवसाय सोडून नवीन काही करावेसे वाटेल. पण त्यांनी तसे करू नये. त्यामुळे नुकसानच होईल. या राशीच्या व्यय स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून तो संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य होणे, मानहानी होणे, विविध प्रकारे मनस्ताप होणे संभवते. या प्रतिकुल काळात या राशीच्या मंडळींनी सर्व प्रकारचे आर्थिक व्यवहार सावधानतेने व काळजीपूर्वकच करावेत. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीशिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ओम वसवे नमः” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी “ओम वरुणाय नमः” : मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अजैकचरणाय नमः” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन -** या राशीच्या धनस्थानी हर्षल असून त्याच्यामुळे मनस्थिती अस्थिर, चंचल होणे संभवते. तसेच बुद्धी अविचारी, विक्षिप्त होण्याची शक्यता आहे. तसे झाले तर हातून अविचारी आचरण घडू शकेल, अविचाराने खर्च कराल व आपल्या फटकळ बोलण्याने अकारण समोरच्याचा अपमान कराल. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी वृषभ राशीत बुध व राहू असे दोन ग्रह असून येथील बुधामुळे
अकारण शत्रुत्व निर्माण होईल, हितशत्रूकडून मनस्ताप दिला जाईल, काही मंडळींकडून राजद्रोह होणेही संभवते. जपा. हा बुध महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी मिथुन राशीत गेल्यावर अनुकुल होईल व त्याच्यामुळे गृहसौख्य व मित्रसुख लाभेल. पण धननाश होण्याची शक्यता आहे. जपा. तृतीय स्थानी बुधासह असलेला राहू अनुकुल होईल व त्याच्यामुळे मन उदार होईल, हरहुन्नरी होईल, हातून कर्तृत्व घडेल, पण तो बंधुसुखात बाधा निर्माण करील. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी मिथुन राशीत प्रथमपासून रवि आहेच. पण तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, दुःख, कार्यदिरंगाई होणे, कौटुंबिक त्रास सहन करावा लागणे, आर्थिक

चिंता त्रस्त करणे, अशापैकी कारणांनी नैराश्य येणे संभवते. येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी कर्क राशीत गेल्यावरही प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे स्वतःस काही आजार होणे, संततीपैकी कोणाच्या अनारोग्याची चिंता निर्माण होणे, अपघात होणे, नोकरीत वरिष्ठांचा जाच सहन करावा लागणे, काही कारणाने प्रिय जनांपासून दूरत्व होणे अशापैकी कारणांनी मन अस्वस्थ होईल. या पंचम स्थानी कर्क राशीत प्रथमपासून मंगळ व शुक्र असे दोन ग्रह आहेतच. हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी सिंह राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत मंगळ ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य होणे, संततिविषयक समस्या त्रस्त करणे, स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करणे अशापैकी घटना मनस्ताप देण्याची शक्यता आहे. महिन्याच्या उत्तरार्धात उष्णता विकाराचा आजार होणे, इजा होणे, अंगावर फोड येणे, रक्तविकार, हृदयविकार अशापैकी आजार होणे संभवते. त्याशिवाय चोरी होणे, आर्थिक नुकसान होणे, अपप्रचाराचा त्रास होणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. महिन्याच्या पूर्वार्धात शुक्र ग्रह कलाक्षेत्रातील विद्यार्थ्यांना अनुकुल व प्रगतिकारक होईल, पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या षष्ठ स्थानी सिंह राशीत गेल्यावर शक्तिहीन होईल व त्याच्यामुळे कलाक्षेत्रातील मंडळींना आपले कलेतील कसब व्यक्त करण्याची संधीच मिळणार नाही. या राशीच्या भाग्यस्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे संततिसुखात बाधा येण्याची शक्यता आहे. तसेच धूर्त, ढोंगी आचरण होणेही संभवते. या राशीच्या लाभस्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून तो सर्वसाधारणपणे शुभ होईल व त्याच्यामुळे आर्थिक प्रगती होणे संभवते. या राशीच्या व्ययस्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील नेपच्यूनमुळे कसली तरी चिंता त्रस्त करील. त्यामुळे मानसिक व्यग्रता व नैराश्य येईल. पण हा नेपच्यून गुप्त पोलिसखात्यात कार्यरत असणारांना उपयुक्त होईल. या स्थानी असलेला गुरु ग्रह सामाजिक कार्याची आवड असणारांना अनुकुल होईल, अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. पण त्याच्यामूळे कौटुंबिक जीवनात काहीही करणाने त्रास, मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. श्रद्धा असेल तर दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे" पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी "ओम अजैकचरणाय नमः" मंत्राचा,

**ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अहिर्बुध्न्याय नमः” मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी “ओम पूषाय नमः” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.**

=====ooooo0ooooo=====